# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. 0712-2557266/2557272 फॅक्स क्र. 0712-2561663

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.i n Website: rdtenagpur.org.in


क्र .तंशिस/विकाना/ ईबीसी /२०१८/ 3976

दिनांक:- 30 NOV 2018

प्रति,

प्राचार्य/संचालक,

पदविका, पदवी , पदव्युत्तर संस्था,

नागपूर विभाग, नागपूर.

विषय – राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना (सन २०१७-१८ ) बाबत.

संदर्भ – १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. विसप-२०१८/प्र.क्र.३९१/तांशि-४, दि २६ नोव्हेंबर, २०१८.

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१८/४३४, दि२९/११/२०१८.

उपरोक्त विषय व संदर्भाच्या अनुषंगाने या विभागांतर्गत येणा-या सर्व संस्थांना कळविण्यांत येते की. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेच्या (सन २०१७-१८ ) बाबत संस्थेत शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काची तफावतीची रक्कम देण्यांकरीता शासनाकडून विचारणा करण्यांत आलेली आहे. त्याअनुषंगाने ही तफावतीची रक्कम देताना ज्या विद्यार्थ्याने प्रत्यक्षात शुल्काची रक्कम यापूर्वीच संस्थेकडे जमा केली आहे याची खात्री केल्यानंतर केवळ अशाच विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये तफावतीची रक्कम जमा करण्यांत येणार आहे.

त्याकरीता संस्थेने सोबत दिलेल्या विवरणपत्रात माहिती (excel sheet मध्ये soft copy )तसेच विद्यार्थ्याने प्रत्यक्षात यापूर्वीच संस्थेकडे जमा केली शुल्काची रक्कम (डीडी/चेक) व संस्थेने विद्यार्थ्यांना प्रदान केलेल्या शिक्षण शुल्काची पावती , या कार्यालयास दि.०५/१२/२०१८ पर्यत तपासणी करिता सादर करण्यांत यावे .सदर मुदती नंतर संपर्क साधणा-या संस्थाचा विचार करण्यांत येणार नाही,याची संस्थांनी कृपया नोंद घ्यावी.

सहपत्र- वरिलप्रमाणे.

(गुलाबसव ठाकरे )

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,

नागपूर.

| अ.क्र. | प्रवेशित वर्ष | Application ID | विद्यार्थ्यांचे नाव | चालु प्रवेशित वर्ष (1st, 2nd... year ) | विद्यार्थ्यांनी भरलेली रक्कम | ईबीसी प्राप्त रक्कम | तफावतची रक्कम | बँकेचे नाव | IFSC Code | खाते क्र. | आधार नंबर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

नागपूर.